# PAPER-II
# MARATHI

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ____________________________
   (Name) ____________________________
2. (Signature) ____________________________
   (Name) ____________________________

| J | 3 | 8 | 1 | 3 |
|---|---|---|---|---|

OMR Sheet No. : ..............................................
(To be filled by the Candidate)

Roll No. | | | | | | | | |
(In figures as per admission card)

Roll No.________________________________
(In words)

Time : **1 $^{1}/_{4}$** hours] [Maximum Marks : **100**

Number of Pages in this Booklet : **8** | Number of Questions in this Booklet : **50**

## Instructions for the Candidates

1. Write your roll number in the space provided on the top of this page.
2. This paper consists of fifty multiple-choice type of questions.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to you. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as below :
   (i) To have access to the Question Booklet, tear off the paper seal / polythene bag on the booklet. Do not accept a booklet without sticker-seal / without polythene bag and do not accept an open booklet.
   (ii) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to pages/questions missing or duplicate or not in serial order or any other discrepancy should be got replaced immediately by a correct booklet from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given.**
   (iii) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each item has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** Ⓐ Ⓑ ● Ⓓ
   where (C) is the correct response.
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Paper I Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done in the end of this booklet.
8. If you write your Name, Roll Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return the original OMR Sheet to the invigilators at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are however, allowed to carry duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table etc., is prohibited.**
12. **There is no negative marks for incorrect answers.**

## परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. पहले पृष्ठ के ऊपर नियत स्थान पर अपना रोल नम्बर लिखिए ।
2. इस प्रश्न-पत्र में पचास बहुविकल्पीय प्रश्न हैं ।
3. परीक्षा प्रारम्भ होने पर, प्रश्न-पुस्तिका आपको दे दी जायेगी । पहले पाँच मिनट आपको प्रश्न-पुस्तिका खोलने तथा उसकी निम्नलिखित जाँच के लिए दिये जायेंगे, जिसकी जाँच आपको अवश्य करनी है :
   (i) प्रश्न-पुस्तिका खोलने के लिए पुस्तिका पर लगी कागज की सील / पोलिथीन बैग को फाड़ लें । खुली हुई या बिना स्टीकर-सील / बिना पोलिथीन बैग की पुस्तिका स्वीकार न करें ।
   (ii) **कवर पृष्ठ पर छपे निर्देशानुसार प्रश्न-पुस्तिका के पृष्ठ तथा प्रश्नों की संख्या को अच्छी तरह चैक कर लें कि ये पूरे हैं । दोषपूर्ण पुस्तिका जिनमें पृष्ठ/प्रश्न कम हों या दुबारा आ गये हों या सीरियल में न हों अर्थात् किसी भी प्रकार की त्रुटिपूर्ण पुस्तिका स्वीकार न करें तथा उसी समय उसे लौटाकर उसके स्थान पर दूसरी सही प्रश्न-पुस्तिका ले लें । इसके लिए आपको पाँच मिनट दिये जायेंगे । उसके बाद न तो आपकी प्रश्न-पुस्तिका वापस ली जायेगी और न ही आपको अतिरिक्त समय दिया जायेगा ।**
   (iii) इस जाँच के बाद OMR पत्रक की क्रम संख्या इस प्रश्न-पुस्तिका पर अंकित कर दें ।
4. प्रत्येक प्रश्न के लिए चार उत्तर विकल्प (A), (B), (C) तथा (D) दिये गये हैं । आपको सही उत्तर के वृत्त को पेन से भरकर काला करना है जैसा कि नीचे दिखाया गया है ।
   **उदाहरण** : Ⓐ Ⓑ ● Ⓓ जबकि (C) सही उत्तर है ।
5. प्रश्नों के उत्तर **केवल प्रश्न पत्र I के अन्दर दिये गये OMR पत्रक पर ही** अंकित करने हैं । यदि आप OMR पत्रक पर दिये गये वृत्त के अलावा किसी अन्य स्थान पर उत्तर चिह्नांकित करते हैं, तो उसका मूल्यांकन नहीं होगा ।
6. अन्दर दिये गये निर्देशों को ध्यानपूर्वक पढ़ें ।
7. कच्चा काम (Rough Work) इस पुस्तिका के अन्तिम पृष्ठ पर करें ।
8. यदि आप OMR पत्रक पर नियत स्थान के अलावा अपना नाम, रोल नम्बर, फोन नम्बर या कोई भी ऐसा चिह्न जिससे आपकी पहचान हो सके, अंकित करते हैं अथवा अभद्र भाषा का प्रयोग करते हैं, या कोई अन्य अनुचित साधन का प्रयोग करते हैं, तो परीक्षा के लिये अयोग्य घोषित किये जा सकते हैं ।
9. आपको परीक्षा समाप्त होने पर मूल OMR पत्रक निरीक्षक महोदय को लौटाना आवश्यक है और परीक्षा समाप्ति के बाद उसे अपने साथ परीक्षा भवन से बाहर न लेकर जायें । हालांकि आप परीक्षा समाप्ति पर OMR पत्रक की डुप्लीकेट प्रति अपने साथ ले जा सकते हैं ।
10. **केवल नीले/काले बाल प्वाईंट पेन का ही इस्तेमाल करें ।**
11. **किसी भी प्रकार का संगणक (कैलकुलेटर) या लाग टेबल आदि का प्रयोग वर्जित है ।**
12. **गलत उत्तरों के लिए कोई अंक काटे नहीं जाएँगे ।**

# MARATHI
# मराठी
## Paper – II
## प्रश्नपत्रिका – II

**Note :** This paper contains **fifty (50)** objective type questions, each question carrying **two (2)** marks. Attempt **all** the questions.

**सूचना :** या प्रश्नत्रिकेत विविध विकल्प असलेले **पन्नास** (50) प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** (2) गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवायचे आहेत.

**1.** राष्ट्रकूट राजवटीतील शके 1079 मधील संपूर्ण मराठी भाषेतील शिलालेख कोणता ?

(A) परळ शिलालेख
(B) पळसदेव
(C) पाटण
(D) पंढरपूर

**2.** जो फेडी लोपी तेआ योगिनींचा वज्रदंडु पडे । - हा मजकूर कोणत्या शिलालेखातील आहे ?

(A) श्रवणबेळगोळ शिलालेख
(B) उन्हकदेव शिलालेख
(C) नेवासे शिलालेख
(D) आंबे शिलालेख

**3.** सैहाद्रिवर्णनात श्रीकृष्णरुक्मिणीच्या विवाहाचे वर्णन असून श्रीऋद्धिपुरवर्णनात ऋद्धिपूर या क्षेत्राचा महिमा गायिला आहे.

(A) संपूर्ण विधान चूक
(B) संपूर्ण विधान बरोबर
(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर
(D) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

**4.** महानुभावांच्या स्फुटरचनेतील 'डंक' हे रूपककाव्य कोणी लिहिले ?

(A) विश्वनाथबास
(B) केशिराजबास
(C) गुर्जर शिवबास
(D) नारायणबास बहाळिये

**5.** 'मानसोल्लास' हा ग्रंथ दुसऱ्या कोणत्या नावाने ओळखला जातो ?

(A) अभिलषितार्थचिंतामणि
(B) कुवलयमाला
(C) महापुराण
(D) ज्योतिषरत्नमाला

**6.** रसाळ अमृत नामयाचे गीत । अनुभवी जाणत तेथिची गोडी ।। अशी नामदेवांच्या रचनेची स्तुती कोणी केली आहे ?

(A) सावता माळी
(B) बहिरा जातवेद
(C) परिसा भागवत
(D) विसोबा खेचर

**7.** ग्रंथ आणि ग्रंथकार यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | अमृतसार | e. | शिवकल्याण |
| b. | कथाकल्पतरु | f. | मृत्युंजयस्वामी |
| c. | बालबोध | g. | कृष्ण याज्ञवल्की |
| d. | नित्यानन्दैक्यदीपिका | h. | त्र्यंबकराज |
| | | i. | निरंजनमाधव |

(A) a – g, b – i, c – f, d – e
(B) a – e, b – g, c – h, d – i
(C) a – f, b – g, c – h, d – e
(D) a – i, b – e, c – f, d – g

**8.** ज्ञानदेवस्तव, नामदेवस्तव, एकनाथस्तव, नरसी मेहतास्तव या संतस्तवनांची रचना कोणी केली ?

(A) मुक्तेश्वर

(B) मोरोपंत

(C) महीपती

(D) वामन पंडित

**9.** चिंचवणी खादलें खादलें । त्या चिंचोऱ्यांचें वृक्ष जालें । त्याच्या चिंचा खादल्या । ईतकें दिवस राहिलें । परि गड हातिं येत नाहीं । - हे वर्णन कोणत्या बखरीतील आहे ?

(A) राक्षसतागडीची बखर

(B) महिकावतीची ऊर्फ माहीमची बखर

(C) चित्रगुप्ताची बखर

(D) शिवदिग्विजयाची बखर

**10.** हरिविजय, पांडवप्रताप, शिवलीलामृत हे ग्रंथ श्रीधरस्वामी नाझरेकर यांनी लिहिले असून त्यांच्या शनिमाहात्म्य या ग्रंथाचे पठण सर्वात अधिक केले जाते.

(A) संपूर्ण विधान चूक

(B) संपूर्ण विधान बरोबर

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

**11.** धनेश्वरचरित्र किंवा चौलराजाची कथा या कल्पित कथेवर स्वतंत्र आख्यान कोणी रचले ?

(A) अमृतराय

(B) मध्वमुनीश्वर

(C) शिवदिनकेसरी

(D) कृष्णदयार्णव

**12.** सत्तावीस किल्ले मी घेतले । घोरपड कधीं नाहीं मागें फिरली । मी आहे मराठ्याचा पोर, नाहीं भिणार मरणाला । एक हात टाकीन । अठरा खांडोळीं पाडीन । शिळया भाकरीसंगें खाईन । - हे वर्णन कोणत्या शाहिराने केले आहे ?

(A) आगीनदास

(B) प्रभाकर

(C) तुळशीदास

(D) हैबती

**13.** भरताला अनुसरून 'वृत्तिगंधि', 'चूर्ण' आणि 'उत्कलिका' असे गद्याचे प्रकार करणारा वामन हा पहिला ग्रंथकार असून त्याने पद्याचे 'अनिबद्ध' आणि 'निबद्ध' हे दोन प्रकार दण्डीकडून घेतले आहेत.

(A) संपूर्ण विधान चूक

(B) संपूर्ण विधान बरोबर

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

**14.** कोणत्या ग्रंथावर अभिनवगुप्ताने लोचन नावाची टीका लिहिली आहे ?

(A) भरतमुनीचे नाट्यशास्त्र

(B) मम्मटाचा काव्यप्रकाश

(C) आनंदवर्धनाचा ध्वन्यालोक

(D) जगन्नाथाचा रसगंगाधर

**15.** ग्रंथ आणि ग्रंथकार यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | काव्यप्रकाशसंकेत | e. | भट्टतौत |
| b. | चित्रमीमांसा | f. | अप्पयदीक्षित |
| c. | कविकण्ठाभरण | g. | माणिक्यचन्द्र |
| d. | अभिधावृत्तिमातृका | h. | क्षेमेन्द्र |
| | | i. | मुकुल |

(A) a – i, b – g, c – e, d – h

(B) a – f, b – i, c – e, d – g

(C) a – g, b – i, c – f, d – e

(D) a – g, b – f, c – h, d – i

**16.** पुढीलपैकी कोणता ग्रंथ प्रभाकर पाध्ये यांचा नाही ?

(A) कलेची क्षितिजे

(B) वामन मल्हार विचारदर्शन

(C) कलेचे कटाक्ष

(D) आस्वाद

**17.** सत्य, शिव व सौजन्य ह्या तत्त्वत्रयीचे प्रतिपादन कोणी केले ?

(A) श्रीपाद कृष्ण कोल्हटकर

(B) नरसिंह चिंतामण केळकर

(C) वामन मल्हार जोशी

(D) द. के. केळकर

**18.** पुढील ग्रंथ कालानुक्रमे लावा :

(A) खडक आणि पाणी, साहित्यनिर्मिती आणि समीक्षा, परंपरा आणि नवता, धार आणि काठ

(B) खडक आणि पाणी, साहित्यनिर्मिती आणि समीक्षा, धार आणि काठ, परंपरा आणि नवता

(C) साहित्यनिर्मिती आणि समीक्षा, धार आणि काठ, परंपरा आणि नवता, खडक आणि पाणी

(D) परंपरा आणि नवता, साहित्यनिर्मिती आणि समीक्षा, धार आणि काठ, खडक आणि पाणी

**19.** आदिबंधात्मक समीक्षेस आधारभूत असलेले ग्रंथ व ग्रंथकार यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | द गोल्डन बो | e. | हॅरॉल्ड ब्लूम |
| b. | आर्किटायपल पॅटर्न्स इन पोएट्री | f. | मॉड बॉडकिन |
| c. | द अनॅटॉमी ऑफ क्रिटिसिझम | g. | नॉर्थोप फ्राय |
| d. | द व्हील ऑफ फायर | h. | जेम्स फ्रेझर |
| | | i. | विल्सन नाइट |

(A) a – i, b – g, c – e, d – h

(B) a – h, b – f, c – g, d – i

(C) a – g, b – i, c – f, d – e

(D) a – g, b – f, c – h, d – i

**20.** रूपवादी समीक्षेत केन्द्रवर्ती असलेल्या अपरिचितीकरणाचे तत्त्व कोणी मांडले ?

(A) रोमान याकोब्सन

(B) व्हिक्टर श्लोव्होस्की

(C) यॅन मुकॉरॉव्हस्की

(D) लिओ टॉलस्टॉय

**21.** निरीक्षक, संघटक, निदेशक, वाहक ही उदाहरणे कोणत्या प्रकारच्या भाषिक परिवर्तनाची होत ?

(A) ध्वनिसादृश्य

(B) रैखिकसादृश्य

(C) रूपगणसादृश्य

(D) अर्थगटसादृश्य

**22.** पुढीलपैकी कोणते तत्त्व स्वनिमनिश्चितीसाठी उपयुक्त नाही ?

(A) पूरक विनियोग

(B) समानार्थकता

(C) वैकल्पिक विनियोग

(D) वैधर्म्ययुक्त विनियोग

**23.** भाषेच्या एककालिक वर्णनासाठी कालक्रमिक अभ्यासाची काही गरज नाही, उलट कालक्रमिक अभ्यास मात्र एककालिक वर्णनावर अवलंबून असतो.

(A) संपूर्ण विधान चूक

(B) संपूर्ण विधान बरोबर

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

**24.** मराठी भाषेच्या उत्पत्तीसंबंधीचे सिद्धान्त व अभ्यासक यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | आठव्या शतकातील वैदिक धर्माच्या पुनरुज्जीवनातून | e. | सुमित्र मंगेश कत्रे |
| b. | दहाव्या-अकराव्या शतकातील भिन्न भाषकांच्या आक्रमणातून | f. | साउथवर्थ |
| c. | पिजिन प्रक्रिया व क्रिऑल प्रक्रिया यांच्या परिणामातून | g. | पां. दा. गुणे |
| d. | अपभ्रंशापासून | h. | शं. गो. तुळपुळे |
| | | i. | चिं. वि. वैद्य |

(A) a – i, b – g, c – f, d – h
(B) a – h, b – f, c – g, d – i
(C) a – g, b – i, c – f, d – e
(D) a – g, b – f, c – h, d – i

**25.** पुढीलपैकी कोणती स्वनविज्ञानाची शाखा नाही ?
(A) उच्चारणकेन्द्री
(B) वितरणकेन्द्री
(C) संचारणकेन्द्री
(D) श्रवणकेन्द्री

**26.** शिपाई, पोषाख, बदाम, दलाल हे शब्द कोणत्या भाषेतून मराठीत आले आहेत ?
(A) अरबी
(B) उर्दू
(C) फारसी
(D) पोर्तुगीज

**27.** पुढीलपैकी कोणता शब्द पोर्तुगीज भाषेतून मराठीत आला नाही ?
(A) अननस
(B) इस्त्री
(C) लिलाव
(D) हौस

**28.** मिया मूठभर दाढी हातभर, चोर तो चोर आणि वर शिरजोर, हजीर तो वजीर, बडे घर पोकळ वासा या म्हणी देवीसिंग चौहान यांच्या मते कोणत्या भाषेतून मराठीत आल्या आहेत ?
(A) फारसी
(B) उर्दू
(C) दक्खिनी हिन्दी
(D) गुजराती

**29.** चोळणा, गुंड, पोट, बिगी-बिगी हे शब्द कोणत्या भाषेतून मराठीत आले आहेत ?
(A) तेलुगू
(B) मल्याळम
(C) तमिळ
(D) कन्नड

**30.** अहाहा, छान, बापरे, छे छे या शब्दांना व्याकरणात काय म्हणतात ?
(A) विशेषणे
(B) क्रियाविशेषणे
(C) केवलप्रयोगी अव्यये
(D) उभयान्वयी अव्यये

**31.** आम्ही नव्या नवरीला भेट-वस्तू दिली, या वाक्यातील नवरीला या शब्दाची विभक्ती व कारकार्थ सांगा.
(A) षष्ठी-अधिकरण
(B) द्वितीया-कर्म
(C) सप्तमी-अधिकरण
(D) चतुर्थी-संप्रदान

**32.** चोर पोलिसाकडून मारला जातो - या वाक्यातील प्रयोग ओळखा.
(A) समापन कर्मणी
(B) कर्मकर्तरी
(C) भावकर्तरी
(D) कर्तृ-कर्मसंकर

**33.** आकाशात ढग जमले परंतु पाऊस पडला नाही, या वाक्याचा प्रकार कोणता ?

(A) केवल वाक्य

(B) संयुक्त वाक्य

(C) मिश्र वाक्य

(D) प्रधान वाक्य

**34.** अतिशय, अभ्यास, अध्यक्ष, उद्योग या शब्दांचा प्रकार कोणता ?

(A) उपसर्गघटित शब्द

(B) प्रत्ययघटित शब्द

(C) अभ्यस्तशब्द

(D) अनुकरणवाचक शब्द

**35.** अक्कलहुशारी, अंमलबजावणी, धनदौलत, बाजारहाट हे शब्द कोणत्या वर्गातील आहेत ?

(A) धातुसाधित

(B) अंशाभ्यस्त

(C) पूर्णाभ्यस्त

(D) सिद्ध

**36.** अनुवादित कृती आणि अनुवादक यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | नाटककाराच्या शोधात सहा पात्रे | e. | श्री. ज. जोशी |
| b. | काळी माती हिरवी नाती | f. | अंजली नरवणे |
| c. | खुर्च्या | g. | माधव वाटवे |
| d. | सागरतीरी | h. | पद्माकर जोशी |
| | | i. | वृंदावन दंडवते |

(A) a – i, b – g, c – f, d – h

(B) a – h, b – f, c – g, d – i

(C) a – g, b – i, c – f, d – e

(D) a – g, b – e, c – i, d – f

**37.** पुढीलपैकी कोणते लेखन भाषांतरित नाही ?

(A) सिंहासनबत्तिशी

(B) हितोपदेश

(C) पंचतंत्र

(D) बकासुराची बखर

**38.** मनोज बसू यांच्या कादंबरीचा 'सौभाग्य' हा अनुवाद कोणी केला ?

(A) सरोजिनी कमतनूरकर

(B) वीणा गवाणकर

(C) वीणा आलासे

(D) ऊर्मिला जावडेकर

**39.** रत्नाकर मतकरी यांचे आचार्य अत्रे यांच्या जीवनावरील नाटक कोणते ?

(A) दुभंग

(B) जोडीदार

(C) सत्तांध

(D) अश्वमेध

**40.** चेतन दातार यांचे एड्स विषयावरील नाटक कोणते ?

(A) स्पर्श अमृताचा

(B) चंद्रपूरच्या जंगलात

(C) अखेरचा सवाल

(D) ध्यानीमनी

**41.** नाट्यकथार्णव नावाचे मासिक कोणी चालवले होते ?

(A) शंकर मोरो रानडे

(B) मा. ना. पाटणकर

(C) वासुदेवशास्त्री खरे

(D) अनंत वामन बर्वे

**42.** अरुण कोलटकरांच्या कवितेबद्दल 'ही कविता बाजूला टाकता येत नाही आणि ती आपल्याला पेलवतही नाही', ही प्रतिक्रिया कोणाची आहे ?

(A) वसंत आबाजी डहाके

(B) दिलीप पुरुषोत्तम चित्रे

(C) सदानंद रेगे

(D) सतीश काळसेकर

**43.** काव्यसंग्रह आणि कवयित्री यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | भरली घागर | e. | शिरीष पै |
| b. | चित्रा | f. | सुहासिनी इर्लेकर |
| c. | चैत्रपुष्प | g. | लक्ष्मीबाई टिळक |
| d. | एका पावसाळयात | h. | सरिता पदकी |
| | | i. | संजीवनी मराठे |

(A) a – i, b – g, c – f, d – h

(B) a – h, b – f, c – g, d – i

(C) a – g, b – i, c – h, d – e

(D) a – g, b – e, c – i, d – f

**44.** पुढीलपैकी कोणते लेखन विज्ञानकादंबरी आहे ?

(A) चिरंजीव

(B) गुगली

(C) बालचंद्र

(D) अभयारण्य

**45.** चरित्र आणि चरित्रकार यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | तीन तपस्वी | e. | शं. के. कानेटकर |
| b. | एस. एम. जोशी | f. | इंदुमती केळकर |
| c. | राम मनोहर लोहिया | g. | प्रभाकर पाध्ये |
| d. | स्वप्नभूमी | h. | वसंत पटवर्धन |
| | | i. | धनंजय कीर |

(A) a – g, b – h, c – f, d – e

(B) a – h, b – f, c – g, d – i

(C) a – g, b – i, c – h, d – e

(D) a – g, b – e, c – i, d – f

**46.** पुढीलपैकी कोणती कादंबरी स्त्री-लेखकाची आहे ?

(A) मंजुळा

(B) प्रेमबंधन

(C) मदनमंजिरी

(D) प्रीतीचा मोबदला

**47.** साहित्यकृती आणि साहित्यकार यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | पहाट | e. | फ. म. शहाजिंदे |
| b. | तो सूर्य आज आला | f. | राजन खान |
| c. | भावनांची वादळे | g. | इलाही जमादार |
| d. | मी - तू | h. | अजीब नदाफ |
| | | i. | ज. जै. शेख |

(A) a – g, b – h, c – f, d – e

(B) a – i, b – h, c – g, d – e

(C) a – g, b – i, c – h, d – e

(D) a – g, b – e, c – i, d – f

**48.** वृत्तांतलेखनाचा केंद्रवर्ती विषय कोणता ?

(A) सभेस जमलेली गर्दी

(B) वृत्तांतलेखकाची आचारसंहिता

(C) वक्त्याच्या भाषणाचा आशय

(D) सभास्थानाचे माहात्म्य

**49.** परिणामकारक जाहिरातीचे मर्म कोणत्या घटकात आढळते ?

(A) जाहिरात करणाऱ्या व्यक्तीचे सौंदर्य

(B) उत्पादनवस्तूची गुणवत्ता आणि उपयुक्तता

(C) जाहिरातीच्या भाषेची वेधकता

(D) जाहिरातीची दृश्यात्मकता

**50.** पुढील शब्द लेखनविषयक नियमानुसार लिहा :

(A) क्षीरसिंधुसमर्पित

(B) क्षिरसिंधुसमर्पित

(C) क्षीरसिंधूसमर्पित

(D) क्षीरसिंधुसमर्पीत

**Space For Rough Work**